# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 2183 / शि.वि. / 2016
दि. 2 / 07 / 2016

प्रति,

**मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,**
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्यमिक शाळा,
म.न.पा. नागपूर.

**विषय :– मतदार अभियानाचा भाग म्हणून कल्पक सूचनात्मक लेख, घोषवाक्य, चित्रकला व मायक्रो फिल्मस्च्या स्पर्धा घेण्याबाबत.**

संदर्भ :– 1)अति.उपायुक्त–1, म.न.पा., नागपूर यांचे पत्र क्र 313 / नि.वि. / म.न.पा. दि.27.06.2016
2)राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र.रानिआ / माजअ–2016 / का.10 दि.07.04.2016.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मतदान जागृती अभियानाचा एक भाग म्हणून आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या दृष्टीने मनपाच्या शाळांमध्ये खाली विषयावर सूचनात्मक निबंध, घोषवाक्य, चित्रकला स्पर्धा व मायक्रो फिल्मस् (जिंगल) हया स्पर्धा घ्यावयाच्या आहे. या स्पर्धा 15 जूलै पर्यंत घ्यावयाचे असून शालेय स्तरावर उत्कृष्ठ एका विद्यार्थ्यांचे निबंध / चित्र निवडणूक विभाग, म.न.पा., नागपूर यांचकडे सादर करावयाचे आहे.

विषय :–

**1)शंभर टक्के मतदान नोंदणी –**

दरवर्षी 1 जानेवारी रोजी वयाची 18 वर्षे पूर्ण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे नाव नोंदविणे व मतदार यादी अद्यावत करण्यासाठी उपाययोजना व जनजागृती.

**2)भरघोस मतदान, स्वयंःस्फुर्त मतदान –**

महानगरपालिका क्षेत्रामध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी उपाययोजना व जनजागृती.

**3) प्रभावी आचरण– प्रभावी मतदान**

महानगरपालिकेची निवडणूक अधिकाधिक निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच आचारसहितेच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी उपाययोजना व जनजागृती.

**4)स्वच्छ उमेदवार, स्वच्छ मतदार**

चांगल्या उमेदवारांना प्रोत्साहन मिळावे म्हणून आर्थिक व दंडशक्तीला आळा घालण्याकरीता उपाययोजना व जनजागृती.

निबंध 250 शब्दाच्या आंत मुद्देसूद व व्यवहार्य लिहावे. चित्रकला स्पर्धेत व्यंगचित्रे, पोष्टर, रेखाटने इत्यांदींचा समावेश आहे. मायक्रो फिल्मस् 30,60 किंवा 90 सेंकदापेक्षा जास्त नसाव्या. यात मायक्रो फिल्मस् बरोबर ऑडीयो / व्हिडीयो, जिंगल्सचाही प्रवेशिका पाठविता येतील. मनपा स्तरावर उत्कृष्ठ प्रवेशिकांना भरघोस रोख बक्षिसे दिल्या जातील.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

pc;2/reshma /Tembhurne sir/letterT